# नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,
# नाशिक शाखा.

कृषी भवन, दुसरा मजला, जिल्हा कृषी औद्योगिक सहकारी संघ लि. नाशिक, एन.डी.सी.सी. बँकेच्या शेजारी,
द्वारका चौक, नाशिक - १, Email:- adtp_nashik@rediffmail.com , दूरध्वनी / फॅक्स क्र. ०२५३-२५९९८३४

---

जा.क्र बांप/मौ.विल्होळी ता.नाशिक/स.नं.१३५/१/१/ससंना/ ९८६४ दिनांक : ११/७/२०१७

प्रति,

**सहा. जिल्हाधिकारी**
**तथा उपविभागीय अधिकारी,**
**नाशिक उपविभाग, नाशिक**

**विषय :- मौजे विल्होळी ता. व जि.नाशिक**
येथील स.नं.१३५/१/१ , भू.क्र. १ व २, क्षेत्र १७४२.४० चौ.मी., मध्ये रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ सुधारीत बांधकाम परवानगी बाबत.

**संदर्भ :-** १) शासन राजपत्र दि. १.३.२०१७
२) मा. महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र. नामप्रविमा, नाशिक विकास परवानग्या/कार्यवाही/३, दि.१८.४.२०१७.
३) आपले पत्र क्र. जमाबंदी/कावि/१७४/२०१७ दि. ६.६.२०१७.

विषयांकित जागा मंजुर प्रादेशिक योजना नाशिक अंतर्गत नाशिक महानगरपालिका परिसर नकाशात शेती विभागात समाविष्ट असुन गांवठाणापासुन ५०० मी. अंतराच्या आंत असल्याने रहिवास वापर अनुज्ञेय आहे. ग.नं.१३५/१ खालील क्षेत्राच्या सिमांकित अभिन्यासास या कार्यालयाने पत्र क.२२४१, दि.२०.०८.२०१४ अन्वये मंजुरीस्तव शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच या कार्यालयाने विषयांकित भूखडांत एकत्रिकणास पत्र क्र. १३२, दि.१५.१.२०१६ अन्वये एकत्रिकरणास शिफारस केलेली आहे. **तसेच संदर्भ क्र.१ अन्वये प्रस्तावित क्षेत्र हे नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात समाविष्ट झालेले आहे.**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ ब अंतर्गत Second Schedule Part-I व Part-II या तरतूदीनुसार विकास शुल्क रु.६७,७२०/- इतकी रक्कम दि.१७.२.२०१६ व रक्कम रु.१९७०/- दि.११.७.२०१७ रोजी शासकीय कोषागारात जमा केलेली आहे. तसेच भविष्यात सदर रकमेबाबत काही तफावत निघाल्यास, नियमानुसार वाढीव रक्कम भरणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

मंजुर प्रादेशिक योजनेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.६.२.११ नुसार अर्जदार यांनी शासन नियमानुसार सुरक्षा अनामत शुल्क भरणे आवश्यक आहे. तथापि, यासंदर्भात संयुक्त, Personal Ledger Account काढणेबाबत शासनाकडुन मार्गदर्शन प्राप्त होईपर्यंत अर्जदार यांचेकडुन "नियमानुसार सुरक्षा अनामत शुल्क भरण्यास बांधिल राहील," असे बंधपत्र / प्रतिज्ञापत्र आपले स्तरावर प्राप्त करुन घेणे तसेच महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभागाचा निर्णय क्र.बीसीए २००९/प्र.क्र.१०८/कामगार ७-अ, दि.२१.०६.२०१० नुसार इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर वसुल करणे आवश्यक राहील.

संदर्भीय पत्रान्वये अभिप्रायार्थ प्राप्त विषयांकित भुखंडात **रहिवास** प्रयोजनासाठी सादर केलेले सुधारीत बांधकाम नकाशे सर्वसाधारणपणे योग्य असून, सदर नकाशांना मंजूरीची शिफारस खालील अटींस अधिन राहून करण्यांत येत आहे.

१) भूखंडाचा वापर **रहिवास व वाणिज्य** कारणासाठीच करणेत यावा.

२) भूखंडाची मापे नकाशावर दर्शविल्याप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर जुळत असली पाहीजेत, व समोरुन, मागून व बाजूने सोडावयाचे सामासिक, अंतरे जागेवर खुली असणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

३) सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक ती कामे नियोजन प्राधिकरणांस समाधानकारक वाटतील अशा प्रकारे केली पाहीजे.

४) अर्जदाराचे यांचे ईंजिनिअर/आर्किटेक्ट यांचेकडून Earth quake Structural Stability Certificate प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

५) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पूर्ततेचा दाखला घेतल्याशिवाय इमारतीचा वापर सुरु करु नये.

६) दिलेली शिफारस ही फक्त एक वर्षासाठी वैध राहील व हया मुदतीत बांधकाम सुरु न झाल्यास शिफारशीचे नुतनीकरण करुन घ्यावे लागेल.

७) नियोजन प्राधिकरणाकडून/ ग्रामपंचायत / महसुल खात्याकडून किंवा इतर खात्याकडून आवश्यक ती परवानगी मिळवणे ही सर्वस्वी अर्जदाराची जबाबदारी राहील. जागेत किमान २० झाडे लावणे व जतन करणे बंधनकारक राहील.

८) या सोबत शिफारस केलेले बांधकाम नकाशे सुधारित करुन पुन्हा परवानगी घ्यावयाची असल्यास मंजूर बांधकाम नकाशे सुधारित करण्याची कारणे नमूद करणे आवश्यक आहे.

९) विषयांकित क्षेत्राच्या स्थळाबाबत व चर्तुःसिमेबाबत भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास जागेवरील परिस्थितीनुसार नकाशा सुधारित मंजूर करुन घेण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

१०) विषयांकित भूखंडांत Rain Water Harvesting बाबतची अंमलबजावणी करणे भूखंडधारकास बंधनकारक राहील.

११) विषयांकित क्षेत्राच्या स्थळाबाबत व चर्तुःसिमेबाबत भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास जागेवरील परिस्थितीनुसार नकाशा सुधारित मंजूर करुन घेण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

१२) इमारत बांधकामात Fly Ash चा वापर करणे बंधनकारक राहील.

१३) एकत्रिकरणाच्या अनुषंगाने अर्जदार सिमांकन नकाशा प्राप्त करुन घेणार असून त्याबाबत काही वाद उपस्थित झाल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी त्यांची राहील.

१४) विषयांकित जागेस मंजुर अभिन्यास पत्र क्र.२२४१, दि.२०.८.२०१४ मधील १८ मी. रुंद ग्रामीण रस्त्यावरुन पोचरस्ता उपलब्ध होत आहे. तसेच सदर पोच रस्त्याबाबत भविष्यात काही वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही अर्जदार यांची राहील.

१५) अर्जदार यांनी प्राप्त fire Advisor Maharashtra fire services यांचे दि. ११.५.२०१६ चे ना-हरकत दाखल्यातील अटी / शर्ती अर्जदार यांना बंधनकारक राहतील.

१६) प्रस्तावित बांधकाम नकाशांखालील जागेचा एकत्रिकरणाचा मोजणी नकाशा सादर करणे आवश्यक राहील.

१७) प्रस्तावित अभिन्यास नकाशावरती जमीनमालक व संबंधित वास्तुविशारद यांनी स्वाक्ष-या केलेल्या असून, सदर स्वाक्ष-या व मालकी हक्क या बाबत महसुल विभागाने आपले स्तरावर खात्री करणे आवश्यक आहे.

१८) विषयांकित प्रकरणी या कार्यालयाने पत्र क्र.२४९१, दि.१४.९.२०१६ अन्वये मंजुरीस्तव केलेली शिफारस निष्प्रभावित करण्यात येत आहे.

१९) अर्जदाराने व संबंधित वास्तुविशारद/अभियंता यांनी सादर केलेली माहिती खोटी अथवा दिशाभुल करणारी असल्यास केलेली शिफारस रद्द समजणेत येईल.

मंजुरीसाठी शिफारस केलेल्या बांधकाम नकाशाची एक प्रत आवश्यक त्या कागदपत्रे कार्यालयाच्या अभिलेखासाठी ठेऊन, मंजुरीसाठी शिफारस केलेल्या नकाशांच्या ४ प्रती सोबत पाठवित आहे.

(जयश्रीराणी बा. सुर्वे)
सहायक संचालक, नगर रचना,
नाशिक

प्रत: मा. महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक तथा विभागीय आयुक्त,नाशिक यांना संदर्भ क्र.२ अन्वये माहितीस्तव सविनय सादर.



Scanned by CamScanner